**सी.एन.आर.क्र.एम.एच.बी.आय१०.०००१२२०-२००६**

**<u>निशानी क्र.८४ वर आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश २२ नियम २ नुसार मयत प्रतिवादी क्र. ३ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याकरीता दाखल केला आहे.

२. वादी यांनी प्रस्तुत अर्जामध्ये असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. ३ द्वारकाबाई हया दि. १०.११.२००८ रोजी मयत झाल्या असून त्यांना त्यांची मुलगी वादी अनिता बळीराम गायकवाड, मुलगा नानासाहेब अनंतराव मेटे (प्रतिवादी क्र.१) आणि प्रदिप अनंतराव मेटे (प्रतिवादी क्र.२) हे वारस आहेत. मयत प्रतिवादी क्र. ३ यांचे वारस हे दाव्यामध्ये वादी व प्रतिवादी म्हणून सामील असून याशिवाय मयत प्रतिवादी क्र. ३ यांना कोणतेही अन्य वारस नाहीत. त्यामुळे मयत प्रतिवादी क्र. १ यांचे वादी व प्रतिवादी क्र. १ व २ हेच वारस आहेत. त्यामुळे सदर अर्ज मंजूर करावा.

३. प्रस्तुत अर्जात प्रतिवादी क्र. १ व ३ यांनी आपले म्हणणे दाखल केले व कथन केले आहे की, सदर प्रकरणात योग्य तो आदेश करण्याची कृपा करावी. निशाणी नं. ८० पाहता हे स्पष्ट होते की, वादीने सदरी प्रकरणात वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी ११ वर्ष १० महिने १८ दिवस लावले. प्रतिवादी नं. ३ ही वादीची जन्मदाती आई आहे. त्यामुळे तिला प्रतिवादी नं. ३ वारलेले तेव्हाच माहीत होते. तरी वादीने दिलेला अर्ज खारीज करण्याची कृपा करावी.

४. वादी यांनी प्रस्तुत अर्जाकामी मयत प्रतिवादी क्र.३ द्वारकाबाई मेटे यांचे मृत्यू प्रमाणपत्र व वारस प्रमाणपत्र व अनंतराव मेटे यांचे मृत्यू प्रमाणपत्र इ. कागदपत्रे दाखल केले आहेत.

५. प्रस्तुत अर्ज व म्हणणे अवलोकीले. प्रस्तुत अर्जाकामी वादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी मयत प्रतिवादी क्र. ३ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याकरीता दाखल केला आहे. मयत प्रतिवादी क्र. ३ यांचे वादी अनिता बळीराम गायकवाड ही मुलगी व प्रतिवादी क्र. १

नानासाहेब अनंतराव मेटे आणि प्रतिवादी क्र. २ प्रविण अनंतराव मेटे हे मुले असून मयत प्रतिवादी क्र. ३ हिस इतर कोणतेही वारस नाहीत. केवळ वादी, प्रतिवादी क्र. १ व २ हेच वारस आहेत व ते दाव्यामध्ये रेकॉर्डवर आहेत असे कथन केले. प्रतिवादी यांनी वादी हे प्रतिवादी क्र. ३ यांची मुलगी असून वादीने ११ वर्ष १० महिने १८ दिवस वारस रेकॉर्डवर घेण्याकामी विलंब केला. त्यामुळे वादीचा अर्ज खारीज करणेबाबत कथन केले.

६. वादी व प्रतिवादी यांच्या कथनाचे व वादी यांनी दाखल केलेल्या मयत प्रतिवादी क्र. ३ यांचे मृत्यू प्रमाणपत्र व वारसांचे प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. ३ हे दि. १०.११.२००८ रोजी मयत झालेचे निदर्शनास येते. तसेच मयत प्रतिवादी क्र. ३ यास वादी व प्रतिवादी क्र. १ व २ हे कायदेशीर वारस असून इतर कोणतेही अन्य वारस नाहीत व ते पूर्वीच दाव्यामध्ये वादीने सामील केले आहेत. त्यामुळे दाव्याचा गुणदोषावर निकाल लागण्याकरीता वादी यांचा अर्ज हा मंजूर होण्यास पात्र आहे. सबब वरील सर्व कारणास्तव मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज हा मंजूर करणेत येतो.

२. वादी व प्रतिवादी क्र. १ व २ हे मयत प्रतिवादी क्र. ३ यांचे वारस असलेने तेच मयताचे वारस असलेचे वादीने नमूद करावे व तशी दुरूस्ती करावी आणि दावा दुरूस्ती प्रत ही सदर आदेश पारीत झालेपासून १४ दिवसांच्या आत दाखल करावी.

दिनांक १४/०९/२०२१

(एस.व्ही.जंगमस्वामी )
२रे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर, केज

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same word to word, as per the original Order / Judgment.

Dictated on : 14.09.2021
Transcribed on : 14.09.2021
Checked & signed on : 14.09.2021

Sd/-
(S.Y. Gore)
Stenographer Grade-3,
Ct. of 2nd Jt. CJJD and JMFC, Kaij.